ज्ञान-विज्ञान विमुक्तये

विश्वविदयालय अनुदान आयोग द्वारा

अनुदानित

# लघु शोध प्रकल्प

# (Minor Research Project)

**2009 - 2011**

## ''नागपूर शहरातील म्हाडाच्या मध्यमवर्गीय गाळयांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार अध्ययन''


–:: मुख्य अनुसंधानकर्ती ::–

सुजाता साखरे

–:: मार्गदर्शक ::–

डॉ. वंदना खुशालानी



## दयानंद आर्य कन्या महाविद्यालय

जरीपटका, नागपूर

# सारांश

**Project Title :** ''नागपूर शहरातील म्हाडाच्या मध्यमवर्गीय गाळयांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार अध्ययन''

प्रत्येकालाच असे वाटत असते की आपलं स्वतःच हक्काचे घर असावे. घराबद्दलचे स्वप्न प्रत्येकाचे वेगळे असू शकते आणि ते स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न कुटुंबप्रमुख करीत असतो. प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) या शासकीय संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या गाळयांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार बांधकाम आहे किंवा नाही याचे अध्ययन केलेले आहे. 'म्हाडा' ही संस्था कुटुंबाच्या मासिक उत्पन्नानुसार गाळे देण्याचे कार्य करते त्यात उच्च, मध्यम, व निम्न वर्ग असे भाग केलेले आहेत. प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये मध्यमवर्गीय गाळयात गृहआयोजनाचे सिध्दांत जसे दृष्टिकोन, बाहयस्वरूप, एकांत, प्रशस्तता, एकत्रीकरण, स्वच्छता, फर्निचर, प्रकाश, मितव्यय, अभिमुखता इत्यादीचा बांधकामामध्ये उपयोग केलेला आहे किंवा नाही हे जानण्यासाठी मुलाखत, प्रश्नावली इत्यादी संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाचा खंड पूर्ण झालेला आहे. नागपूर शहरातील पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा भागामध्ये तसेच भंडारा व वर्धा शहरामधील म्हाडांनी बांधलेल्या मध्यम उत्पन्न गटातील गाळयांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार बांधकाम आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली आहे आणि त्या आधारे निष्कर्ष काढण्याचा मुख्य हेतु म्हणजे संशोधन विषयातील निश्चित व तात्विक दृष्टिकोनातून काही अपेक्षित माहिती स्पष्ट रूपाने यावी ही होय.

प्रस्तुत संशोधन हे मध्यम उत्पन्न गटातील आहे. त्यांच्या वार्षिक उत्पन्नातून बचत करून आपले हक्काचे घर म्हाडापासुन प्राप्त केलेले आहे. आपल्या घरात सर्व सुख–सुविधा मिळाव्यात, सुरक्षा मिळावी ही सामान्य अपेक्षा जर मध्यम कुटुंबातील सदस्य ठेवत असतील तर त्यात वावडा नाही, किंबहुना या अपेक्षा त्यांच्या निश्चित पूर्ण व्हायला हव्यात पण गृहआयोजनाचे जे सिध्दांत आहेत की ज्यामुळे हवा, प्रकाश, बाहयस्वरूप, एकांत, समाधान मिळतो, तो मात्र या गाळयांमध्ये दिसत नाही तेव्हा म्हाडाच्या गाळयांमध्ये गृहआयोजन सिध्दांतांचा उपयोग व्हायला हवा.

'म्हाडा' या शासकीय संस्थेने मध्यम उत्पन्न वर्गाच्या कुटुंबाची निवासाची गरज भागविली आहे. त्यांच्या वाजवी उत्पन्नामध्ये घराची सोय करून दिली आहे. परंतु त्यांच्या गाळयामध्ये गृहआयोजनाच्या सिध्दांताचा अभाव दिसतो. पूर्णतः सिध्दांताचा उपयोग केलेला दिसुन येत नाही पण कमी आर्थिक उत्पन्नामध्ये निवासाची गरज पूर्ण झाली त्यामुळे तेथिल रहिवाश्यांना मानसिक समाधान मिळाले आहे.